2024 VII 16 - 1100
२०२४.०७.१६ - ११००

# N 301

Seat No.
बैठक क्र.

Time : 3 Hours MARATHI FIRST LANGUAGE – 01 (M)

वेळ : ३ तास मराठी प्रथम भाषा - ०१

(REVISED COURSE)

Pages - 16 Total Marks : 80

पृष्ठे - १६ एकूण गुण : ८०

---

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :—**

(1) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.

(2) आकृत्या पेननेच काढाव्यात.

(3) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.


(4) विभाग-5 उपयोजित लेखन प्र. 5 (अ) (2) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र. 1 (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.

(5) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

## विभाग-1 : गद्य

**1.** (अ) **उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(1) खालील आकृती पूर्ण करा : 2





P.T.O.

आता मी उतरू लागले होते. जेमतेम 40-50 पावलांवरच माझा ऑक्सिजन साठा संपला.... एक सांगू ? लक, भाग्य, किस्मत, डेस्टिनी असल्या भाकड शब्दांना मी नाही मानत; पण **Fortune favours the braves** यावर माझा पूर्ण विश्वास आहे..... जेव्हा मी गुदमरू लागले, श्वास घेण्याचा प्रयत्न करू लागले, अगदी त्याच वेळी एका ब्रिटिश माणसाने ओझे होते म्हणून फेकून दिलेला जास्तीचा एक ऑक्सिजन सिलिंडर आम्हांला दिसला. माझ्या शेरपाने तो चटकन मला अडकवला. सावकाश आम्ही त्या 'डेथ झोन'मधून सहीसलामत खाली उतरलो. वर चढण्यापेक्षा खाली उतरताना होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण जास्त आहे..... आणि आम्ही ते ओलांडून आलो होतो. 'माझा दिवस' अखेर आला होता.... गिर्यारोहकांच्या चढाईच्या टप्प्यातले एक महत्त्वाचे शिखर 'एव्हरेस्ट' मी सर केले होते!

गिर्यारोहणाने मला खूप महत्त्वाचे काही धडे दिले. माझ्यात आत्मविश्वास जागवला. नेतृत्व, गटबांधणी यांचे धडे तर मिळालेच; पण एक पोलादी कणखरपणा माझ्यात निर्माण केला. मित्रांनो, आपण आयुष्यात काय मिळवतो हे महत्त्वाचं नाही, तर ही कमाई आपल्याला अधिक चांगली व्यक्ती कशी बनवते, हे महत्त्वाचं वाटतं मला. आपण इतरांशी कसे वागतो यावरून आपण एक उत्तम व्यक्ती आहोत की नाहीत हे ठरतं.

(2) खालील चौकटी पूर्ण करा : 2




(3) **स्वमत :** 3

'कर्तृत्ववान माणूस नशिबावर अवलंबून राहत नाही' याविषयी तुमचे मत लिहा.

(आ) **उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(1) चौकटी पूर्ण करा : 2




आमची ढाळज म्हणजे गावाचं वर्तमानपत्र होतं आणि आजी त्याची संपादक होती. तर सगळ्या बातम्या तिथं यायच्या. त्यांची शहानिशा व्हायची न् मग त्या गावभर जायच्या. कडुसं पडायच्या आधी ही मैफिल मोडायची. माणसांची वेळ झाली, की म्हातारीची ढाळज सुटायची. माणसं ढाळजंत बसायची. रात्री आठच्या दरम्यान ढाळजंचा दरवाजा लागला आणि एकदा आतनं आगळ टाकली, की वाडा शांत व्हायचा. ही आगळ दरवाजाला लावणं किंवा ती काढणं म्हणजे आमच्यासाठी दिव्य असायचं. मुळात ही सहा फुटांची लांब आणि पाऊण फूट रुंद अशी सागवानी आगळ एका भिंतीतल्या देवळीत आरपार जायची. ती आरपार घालवून दरवाजा उघडणं किंवा तिच्या तोंडाला असणाऱ्या पितळी वाघाच्या जबड्यातील कडीला हात घालून ती बाहेर ओढणं व समोरच्या भिंतीतल्या

देवळीत ढकलणं फार अवघड गणित होतं. ही आगळ म्हणजे दरवाजाचं, पर्यायाने वाड्याचं, भरभक्कम संरक्षक कवच होतं. दुपारीही एकदा आगळ टाकली की उन्हाचं, सुट्टीचं आम्हांला बाहेर पडायला संधी नसायची, तसाच रात्री त्या आगळीचा आधारही तितकाच वाटायचा. भर उन्हात मग आजीला जास्त त्रास होऊ न देता तिथंच ढाळजंत, पडवीत, सोप्यात कुठंही आम्ही बैठे खेळ खेळायचो.

(2) एका शब्दात उत्तरे लिहा : 2

(*i*) वर्तमानपत्राची संपादक............

(*ii*) वाड्याचं भरभक्कम संरक्षक कवच.............

(3) **स्वमत :** 3

'आमची ढाळज म्हणजे गावाचं वर्तमानपत्र होतं,' या विधानाचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा व त्याविषयी तुमचे मत लिहा.

**अपठित गद्य**

(इ) **उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

(1) आकृतिबंध पूर्ण करा : 2

(*i*) अधिकारवाणीने जागा होणारा – [ ]

(*ii*) राष्ट्राचे प्रमुख असणारे – [ ]

आपण कोणतंही कार्य करताना 'मी' सोडून सर्वांनी हे करावं अशी भूमिका असते. पण आमचं नेमकं चुकतं कुठे ? इथेच तर! कारण 'मी' स्वत:ला कधी गृहीत न धरल्याने माझ्यातील अधिकारवाणीचा अहंभाव जागा होतो. त्यामुळे केवळ हे काम माझे नाहीच ते इतरांनी करायचे आहे अशीच माझ्या मनाची भूमिका होते. पण या भूमिकेत जे कोणी असतात त्यांनी एक ओळखायला हवे की स्वत:कडे ध्येय नसताना इतरांकडून कोणतीही कृती करून घ्यायची तेव्हा आमची अवस्था "तुझं आहे तुजपाशी, परि तू जागा चुकलाशी" अशीच होणार. आजपर्यंत डॉ. कलाम सर यांनी नेमकं हेच जाणलेलं होतं. आपण तसे एका राष्ट्राचे राष्ट्रपती आहोत, म्हणून केवळ अधिकारवाणीने जगत राहिलो तर, तर काहीच साध्य होणार नाही.

संदर्भ—

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम

चिरंतन प्रेरणा

लेखक — श्री. के. आर. पाटील

प्रकाशक — ज्ञानसंवर्धन प्रकाशन,

कोल्हापूर

(2) योग्य पर्याय निवडा : 2

(*i*) अहंभावी माणसाजवळ नसणारी गोष्ट —

(अ) मीपणा

(आ) ध्येय

(इ) अधिकारवाणी

(ई) साध्य

(*ii*) डॉ. कलाम यांनी जाणलेली गोष्ट –

(अ) अधिकारवाणी गाजवणं

(आ) इतरांकडून काम करून घेणं


(इ) ध्येयनिष्ठ बनून काम करणं

(ई) कामाकडं दुर्लक्ष करणं

## विभाग–2 : पद्य

**2.** (अ) **कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(1) आकृती पूर्ण करा – 2




वस्तूंना जीव नसेलही कदाचित, पण
जीव नसल्यासारखे वागवू नये त्यांना.
वस्तूंना मनही नसेल कदाचित, पण ते
असल्यासारखे वागलो तर वस्तू
प्रचंड सुखावतात.

वस्तू निखालस सेवकच असतात आपल्या,

तरीही बरोबरीचाच मान द्यावा त्यांना.

वस्तूंना वेगळी, स्वतंत्र खोली नको असते,

त्यांना फक्त 'आपल्या मानलेल्या' जागेवरून

निष्कासित न होण्याची हमी द्या.

वस्तूंनाही असते आवड स्वच्छ राहण्याची,

हे हातांना लक्षात ठेवायला सांगा.

वस्तूंना जपावे, लाडावूनही ठेवावे त्यापुढे जाऊन.

त्याच जिवंत ठेवणार आहेत आपला स्नेह

नंतरच्या काळातही.

आयुष्य संपले की वस्तूंनाही आजवरच्या

हक्काच्या घरात राहू देत नाहीत, तेव्हा

कृतज्ञतापूर्ण निरोपाचा त्यांचा हक्क

शाबूत ठेवावा.

(2) कारणे लिहा : 2

(*i*) वस्तूंना जपावे आणि त्यांचे लाडही करावेत, कारण.............

(*ii*) वस्तूंना हक्काच्या घरात राहू दिले जात नाही, कारण.............

(3) खालील काव्यपंक्तींचा सरळ अर्थ तुमच्या शब्दांत लिहा : 2

आयुष्य संपले की वस्तूंनाही आजवरच्या
हक्काच्या घरात राहू देत नाहीत, तेव्हा
कृतज्ञतापूर्ण निरोपाचा त्यांचा हक्क
शाबूत ठेवावा.

(4) **काव्यसौंदर्य :** 2

'वस्तूंनाही असते आवड स्वच्छ राहण्याची' या बाबतचा तुमचा दृष्टिकोन सांगा.

(आ) **खालील मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही *एका* कवितेसंबंधी खालील कृती सोडवा :**

| | **'आकाशी झेप घे रे' किंवा 'खोद आणखी थोडेसे'** | | |
|---|---|---|---|
| (*i*) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री— | ................ | ................ | 1 |
| (*ii*) कवितेचा विषय— | ................ | ................ | 1 |
| (*iii*) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे | ................ | ................ | 2 |

(इ) **रसग्रहण :** 4

खालील काव्यपंक्तींचे रसग्रहण करा :

माझ्या घराच्या झरोक्यातून दिसतं आहे
एक आश्वासक चित्र उद्याच्या जगाचं
जिथं खेळले जातील सारेच खेळ एकत्र.

## विभाग–3 : स्थूलवाचन

**3. खालीलपैकी कोणत्याही *दोन* कृती सोडवा :** 6

(1) टीप लिहा :

व्युत्पत्ती कोशाचे कार्य

(2) 'माणसे पेरा। माणुसकी उगवेल' या विधानाचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

(3) गिरिजा कीर यांच्या बालनाटिकांचे विशेष लिहा.

## विभाग–4 : भाषाभ्यास

**4. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती :**

(1) **समास :**

खालील तक्ता पूर्ण करा : 2

| सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|
| ................ | चार किंवा पाच | ................ |
| नीलकमल | ................ | ................ |

(2) **शब्दसिद्धी :**

खालील तक्ता पूर्ण करा : 2

(हुरहुर, गुलामगिरी, उपसंपादक, दुकानदार)

| **उपसर्गघटित** | **प्रत्ययघटित** | **अभ्यस्त** |
|---|---|---|
| ............. | ............ | ............. |
| ............. | ............ | ............. |

(3) **वाक्प्रचार :**

खालीलपैकी कोणत्याही **दोन** वाक्प्रचारांचा अर्थ सांगून त्या वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा : 4

(*i*) पित्त खवळणे–

(*ii*) पारख करणे–

(*iii*) खस्ता खाणे–

(*iv*) आनंद गगनात न मावणे–

(आ) **भाषिक घटकांवर आधारित कृती :**

(1) **शब्दसंपत्ती :**

(1) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा : 1

(*i*) पुरामुळे नुकसान झालेले लोक – ☐

(*ii*) खूप दानधर्म करणारा – ☐

(2) खालील शब्दांना समानार्थी शब्द लिहा : 1

(*i*) आकाश – ☐

(*ii*) हर्ष – ☐

(3) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा : 1

(*i*) आदर × ...............

(*ii*) सावध × ...............

(4) खालील शब्दातील अक्षरांपासून **दोन** अर्थपूर्ण शब्द तयार करा : 1

राजमानस – [राज आणि मानस हे शब्द वगळून]

(2) **लेखननियमांनुसार लेखन :** 2

अचूक शब्द ओळखा. (कोणतेही **चार** शब्द सोडवा.)

(*i*) हनुवटी, हनूवटी, हनुवटि, हनूवटि

(*ii*) किर्ती, किर्ति, कीर्ति, कीर्ती

(*iii*) माहिती, माहीती, माहिति, माहीति

(*iv*) आशिर्वाद, आर्शीवाद, आर्शिवाद, आशीर्वाद

(*v*) सूरक्षीत, सूरक्षित, सुरक्षित, सुरक्षीत

(*vi*) दीपावली, दिपावली, दीपावलि, दिपावलि

(3) **विरामचिन्हे :** 1

खालील वाक्यातील विरामचिन्हांची नावे लिहा :

जग विचारेल तुम्हांला, शाळेत तुम्हांला किती गुण मिळाले ?

| **विरामचिन्हे** | **नावे** |
|---|---|
| , | |
| ? | |

(4) **पारिभाषिक शब्द :** 1

खालील शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा :

(*i*) Bio-data — ☐

(*ii*) Unit — ☐

## विभाग-5 : उपयोजित लेखन

**5.** (अ) **खालील कृती सोडवा :** 6

(1) **पत्रलेखन :**

खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही **एक** कृती सोडवा :

**आदर्श विद्यालय, अहमदनगर**

स्वच्छता सप्ताहानिमित्त विशेष उपक्रम

दि. 1 ऑक्टोबर ते दि. 7 ऑक्टोबर

— शालेय परिसर स्वच्छता व वर्गखोल्या स्वच्छता —

विद्यालयात 'स्वच्छतादूत' म्हणून काम

केलेल्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार

सत्कार समारंभ — दि. 7 ऑक्टोबर

दु. 4.00

संपर्क — विभाग प्रमुख, स्वच्छता सप्ताह उपक्रम

adarshvidya24@ gmail.com

अमर/अमृता शाह

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

विभागप्रमुखांना स्वच्छता करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची मागणी करणारे पत्र लिहा.

←**किंवा**→

स्वच्छतादूतांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

**किंवा**

(2) **सारांशलेखन :**

विभाग-1 : गद्य (इ) [प्र. क्र. 1 (इ)] मधील अपठित गद्य उताऱ्याचा एक-तृतीयांश सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

(आ) **खालीलपैकी कोणत्याही *दोन* कृती सोडवा :** 10

(1) **जाहिरातलेखन :**

खालील मुद्द्यांचा योग्य उपयोग करून आकर्षक जाहिरात तयार करा.

खेळाच्या साहित्याचे दुकान

पत्ता

साहित्यावर विशेष सवलत

दुकानाची वैशिष्ट्ये

दुकानाची वेळ

साप्ताहिक सुट्टी

(2) **बातमीलेखन :**

26 जानेवारी रोजी सरस्वती विद्यामंदीर, जळगाव या शाळेत 'प्रजासत्ताक दिन' साजरा करण्यात आला. या समारंभाची बातमी तयार करा.

(3) **कथालेखन :**

खाली दिलेल्या मुद्द्यांवरून आकर्षक कथा लिहा :

शेतकऱ्याची मुलं – अजित व सुजित – अजित मेहनती – सुजित आळशी – सुजितला वारंवार मेहनतीचा सल्ला – सुजितने न ऐकणे – शेतकऱ्याचे परगावी जाणे – भरपूर काम करण्याचे आदेश मुलांना देणे – अजित यशस्वी – सुजित अयशस्वी –

(इ) खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही **एक** कृती सोडवा : 8

(1) **प्रसंगलेखन :**

आंतरशालेय कबड्डी स्पर्धेत अंतिम
सामन्यात तुमच्या शाळेचा संघ विजयी.
मा. जिल्हा क्रीडाधिकारी यांच्या हस्ते सत्कार.


कौतुकाचा वर्षाव | आनंदोत्सव

दि. 15 डिसेंबर
स्थळ – दयानंद सभागृह, कोपरगाव
वेळ – सकाळी 11.00

वरील प्रसंगी विजयी संघातर्फे तुम्ही उपस्थित होता अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.

(2) **आत्मकथन :**

खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे चौकटीतील घटकाचे आत्मकथन लिहा.




(3) **वैचारिक :**

'ग्रंथ माझे गुरू' या विषयावर खालील मुद्द्यांना अनुसरून तुमचे विचार लिहा.

